# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE


---

गुरुवार, दिनांक ५ सप्टेंबर, २०१९

## निदेश

**क्र. २९/२०१९** **दिनांक : ५.९.२०१९**

### आचार्य पदवी कोर्स वर्क कार्यप्रणाली

ज्याअर्थी, अध्यादेश क्रमांक १/२०१६ च्या तरतुदीनुसार सर्व संबंधित संशोधन केंद्रावर आचार्य पदवीकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता कोर्स वर्क सुरु करणे अपेक्षित आहे. विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांनी स्वतंत्रपणे कोर्स वर्क सुरू करणेऐवजी विद्याशाखानिहाय (Faculty-wise) व कोर्सवर्क बाबत कार्यप्रणाली ठरवून विद्यापीठातच एकत्रितपणे कोर्सवर्क चालू करणेकरीता मा. कुलगुरू यांनी समिती गठीत केली होती. सदर समितीने कोर्सवर्क राबविण्याकरीता सुचविलेल्या कार्यप्रणाली मा. कुलगुरूंनी मान्यता प्रदान केलेली आहे.

ज्याअर्थी, अधिसूचना क्रमांक ६१/२०१९ नुसार कोर्सवर्क बाबतची कार्यप्रणाली विद्यापीठ परीसरातील सर्व संशोधन केंद्रांना लागू असेल.

ज्याअर्थी, आचार्य पदवी कोर्सवर्क अभ्यासक्रमात ०५ Module असून यापैकी (Research Methodology) व (ICT Skills ) हे एकत्रितपणे पूर्ण करण्यात येईल. व ०३ Module संबंधित संशोधन केंद्राकडून पूर्ण केल्या जातील.

ज्याअर्थी, आचार्य पदवी कोर्सवर्क राबविण्याकीरता संबंधित कोर्सवर्क कार्यप्रणालीनुसार विविध विद्याशाखेकरीता समन्वयक व सहसमन्वयक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच Research Methodology या विषयासाठी व ICT Skills या विषयासाठी साधन व्यक्ती आमंत्रित करून कोर्सवर्क पूर्ण करावयाचा आहे.

ज्याअर्थी, कोर्सवर्ककरीता गठीत समितीने कोर्सवर्क राबविण्याकरीता समन्वयक, सहसमन्वयक व साधन व्यक्ती यांचे मानधन खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम ३७ (१) (द) नुसार अधिष्ठाता मंडळ विनियमाचा मसुदा तयार करून व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी सादर करणे.

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेची सभा नियोजीत नाही.

ज्याअर्थी, विनियम तयार करण्याकरीता अवधी लागणार आहे.

त्याअर्थी, मी डॉ.मुरलीधर चांदेकर, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ च्या कलम १२ (८) नुसार प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून सदर निदेश जारी करीत आहे.

१) सदर निदेश निर्गमित केल्याचे दिनांकापासून लागू होईल.

२) सदर निदेश ñआचार्य पदवी कोर्स वर्क कार्यप्रणालीò, म्हणून संबोधित होईल.

| अ.क्र. | विवरण | मानधन |
|---|---|---|
| १ | समन्वयक ( विविध विद्याशाखा) | रूपये ६०००/- |
| २ | सहसमन्वयक ( विविध विद्याशाखा) | रूपये ५०००/- |
| ३ | साधन व्यक्ती मानधन (Research Methodology) | रूपये १०००/- (प्रती तास) |
| ४ | साधन व्यक्ती मानधन (ICT Skills) | रूपये ५००/- (प्रती तास) |

१) साधनव्यक्ती T.A.,D.A. विद्यापीठ नियमानुसार राहील.

२) समन्वयक, सहसमन्वयक व साधन व्यक्ती यांचे मानधन व T.A.,D.A. अंदाजपत्रकातील खालील Common Budget Head (सर्व शैक्षणिक विभागाकरीता ) मधून खर्च करण्यात येईल.
Ph.D. Course Work ( Research Methodology and ICT Skills )

**<u>Fund Management for Common Budget Head</u>**

१) प्रत्येक संशोधन केंद्राला (शैक्षणिक विभाग निहाय) खालील शिर्ष असतील.

अ) Ph.D. Course Work Fee
ब) Annual Fee (Research Laboratory fee)

प्रत्येक विभागाच्या संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची Course Work Fee ही Ph.D. Course Work Fee या शिर्षाअंतर्गत जमा होईल. या शुल्काच्या ४० % शुल्क हे Ph.D. Course Work ( Research Methodology and ICT Skills ) या Common Budget Head मध्ये Transfer होतील. व उर्वरीत ६० % शुल्क व Annual Fee (Research Laboratory fee) संशोधन केंद्राचा विकास व अनुषंगीक खर्चासाठी उपयोगात आणण्यात येईल.

२) आचार्य कोर्सवर्क मधील उर्वरीत ०३ Module संशोधन केंद्रावरच पूर्ण करण्यात येतील. शैक्षणिक विभागात प्रचलित असलेल्या पध्दतीनुसार साधनव्यक्तीचे मानधन व इतर लागणारा खर्च संशोधन केंद्राच्या Ph.D. Course Work Fee शिर्षामधून करण्यात यावा.

३) विविध विद्याशाखेकरीता नियुक्ती केलेले समन्वयक/सहसमन्वयक यांचेकडे Research Methodology and ICT Skills याकरीता घेण्यात येणाऱ्या कोर्सवर्क खर्चाची देयके शोधनाकरीता वित्त विभागात सादर करतील.

दिनांक : १/०९/२०१९
स्थळ : अमरावती

स्वा/-
(डॉ.मुरलीधर चांदेकर)
कुलगुरू,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ